MHAU060017492019

**नियमित दिवाणी दावा क्र. १७३/२०१९ मधील नि.क्र. १७ खालील आदेश**

१. प्रतिवादी क्रं. २ यांनी सदर अर्ज त्यांच्या विरुध्द दिनांक ३०.०८.२०२१ रोजीचा विना कैफियतीचा आदेश रद्द करण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे नम्र विनंती की, प्रस्तुत दाव्यातील वादी ही प्रतिवादी क्रं. २ ची सख्खी भावजाई असुन शेजारी जवळ रहायला आहे. प्रतिवादी प्रस्तुत दाव्यात पुर्वीच्या वकीलामार्फत हजर झाल्यानंतर गावातील प्रतिष्ठीत लोकांच्या समक्ष वाद मिटविण्याच्या प्रयत्न झाला त्यावेळी वादी व तिच्या पतीने आमचा वाद मिटला आम्ही दावा काढुन घेतो असे सर्वासमोर सांगितल्याने प्रतिवादी यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवुन पुढे तारखेवर आले नाही व आपला लेखी जबाब व से दाखल करु शकले नाहीत. मध्यंतरीच्या काळात प्रतिवादी हे आजारी असल्यामुळेही कोर्टाच्या तारखेवर येवु शकले नाही अथवा वकील साहेबांशी संपर्क करु शकले नाहीत. त्यामुळे लेखी जबाब व से दाखल करता आला नाही. मा. कोर्टाने दिनांक ३०.०८.२०२१ रोजी प्रतिवादी विरुध्द मुदतीत लेखी जबाब व से दाखल केला नाही म्हणुन त्यांच्या विरुध्द आदेश नि.क्रं. १ वर पारीत केला आहे जो रद्द होणे न्याय योग्य आहे. प्रतिवादीस नैसर्गिक न्याय तत्वानुसार संधी मिळणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांना हेतुपुरस्कर विलंब केला नाही. प्रतिवादीस न टाळता येणारी व हाताबाहेरची परिस्थिती निर्माण झाल्याने त्यांनी मुदतीत लेखी जबाब व से दाखल केला नाही. तरी त्यांच्याविरुध्द झालेला आदेश रदद व्हावा अशी विनंती केली.

२. सदर अर्जास वादीने अर्जाच्या मागील बाजुस म्हणणे दाखल करुन हरकत घेतली की, प्रतिवादीने हेतुपुरस्कपपणे प्रकरण लांबविण्याच्या हेतुने मुदतीत लेखी जबाब दाखल केलेला नाही. तसेच निश्चीत कारण अर्जात नमुद नसल्याने प्रतिवादींचा अर्ज खर्चासहीत नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीने सदर दावा कायमचा मनाईहुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला. सदर दाव्याचे समन्स व नोटीस प्रतिवादींना दिनांक १७.०८.२०२० रोजी बजावलेली आहे.

त्यानंतर सदर प्रतिवादी क्रं. २ यांना त्यांचे वकीलांमार्फत दिनांक २३.१०.२०२० रोजी न्यायालयात हजर झाले परंतु त्यानंतर सदर प्रतिवादी क्रं. २ गैरहजर राहिले व त्यांची कैफियत दाखल केली नाही त्यामुळे त्यांचेविरुध्द दिनांक ३०.०८.२०२१ रोजी विनाकैफियत आदेश पारित करण्यात आला. प्रतिवादी क्रं. २ यांनी प्रस्तुत अर्जात केल्यानुसार प्रस्तुत दाव्यात पुर्वीच्या वकीलांमार्फत गावातील प्रतिष्टीत लोकांच्या समक्ष वाद मिटविण्याचा प्रयत्न झाला व त्यावेळी वादी व तिच्या पतीने वाद मिटला आहे आम्ही दावा काढुन घेतो असे सांगितले होते. तसेच मध्यंतरी प्रतिवादी हे आजारी असल्यामुळे न्यायालयात येवु शकले नाही असे कथन केले आहे. परंतु सदर वादी वाद मिटल्याची बाब मान्य केलेली नाही तसेच प्रतिवादी आजारी असल्याबाबत कोणतेही वैद्यकीय कागदपत्र अर्जासोबत दाखल केलेली नाहीत.  त्यावरुन अर्जात दिलेले कारण हे सबळ कारण असल्याचे दिसुन येत नाही.  परंतु असे जरी असले तरी सदर दाव्याचे स्वरुप पाहता तसेच प्रस्तुत अर्जातील कारणाचा विचार करता प्रतिवादी क्रं. २ यांना त्यांची म्हणने मांडण्याची संधी देणे आवश्यक व गरजेचे आहे. प्रतिवादी क्रं. २ चा अर्ज मंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करुन पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

प्रतिवादी क्रं. २ यांचा  नि.क्र. १७ चा अर्ज वादीस रक्कम रु.१०००/–
(अक्षरी एक हजार रुपये मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2023.08.12 12:02:52 +0530

**(पी.एम.कोळसे)**

दिनांक– ११.०८.२०२३

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (कोर्ट न.१)
कन्नड

**<u>प्रमाणपत्र</u>**

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | यो. सु. माळी. |
| न्यायालयाचे नांव | – | श्री. प्र. मा. कोळसे.<br>दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),<br>तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | ११.०८.२०२३ |
| न्यायिक अधिका–यांनी | – | |
| निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | ११.०८.२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | १२.०८.२०२३ |

..................................................................